महाबीज

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
## विभागीय कार्यालय,शिवणी,अकोला

Mob. 7588609297 Mail -:rmakola@mahabeej.com
Web: - www.mahabeej.com CIN:- U01200MH1976SGC01

# E-TENDER FORM

(वाहन भाड्याने पुरवठा करण्याबाबतच्या निविदा)

ई निविदा प्रपत्र किंमत रु.५९०/- (जी.एस.टी. सह)
ई-निविदा प्रपंत्र भरण्यासाठी अखेरचा दिंनाक १२.०१.२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत
ई- निविदा प्रपत्र उघडण्याचा दिंनाक १३.०१.२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत
ई- निविदा उघडण्याचे ठिकाण — विभागीय कार्यालय, शिवणी अकोला

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
## विभागीय कार्यालय,शिवणी,अकोला

Mob. 7588609297 Mail -:rmakola@mahabeej.com
Web: - www.mahabeej.com CIN:- U01200MH1976SGC01


जा.क्र. विव्य/महाबीज/अकोला/२०२५-२६/६२६ दिनांक : ०३/०१/२०२६

## : ई—निविदा सुचना :

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला विभाग येथील विभागीय व्यवस्थापक अकोला यांचे कार्यालयीन वापराकरिता मासिक धर्तीवर स्वीफ्ट डिझायर किंवा समकक्ष राष्ट्रीय परवाना प्राप्त (नॅशनल परमिट) वाहनाचा भाडे तत्वावर पुरवठा करण्याकरिता विविध ठिकाणचे टॅक्सी सेंटर्सकडुन ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदामध्ये दर हे एकुण मासिक रक्कमेच्या (निविदा मध्ये दिलेला आहे) कमी किंवा जास्त भरावयाचे आहे. सदर ई-निविदेमध्ये डिझल/पेट्रोल सह आणि विना डिझल/पेट्रोल एकुण रक्कम नमुद करावयाचे आहे.

ई-निविदा दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील. ई- निविदासाठी अनामत रक्कम रु.५०००/- व निविदा प्रपत्र ची फी रु.५९०/- (जी.एस.टी. सह) निविदाधारकाला अनामत रक्कम व प्रपत्र ची फी ऑनलाईन भरावे लागतील.

निविदा हया फक्त ई-निविदा पध्दतीनेच भरावयाच्या आहेत. निविदा प्रपत्र हे महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर म्हणजे www.mahatenders.gov.in वर ०४ जानेवारी २०२६ ते १२ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरण्यासाठी उपलब्ध असतील. ई-निविदा दि.१३ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी ११.०० विभागीय कार्यालय शिवणी अकोला येथे उघडण्यात येतील.

कोणतेही कारण न दर्शविता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा नामंजुर करण्याचा अधिकार महामंडळाने राखुन ठेवला आहे.

म.रा.बि.म.मर्या., करिता

विभागीय व्यवस्थापक,
महाबीज, अकोला.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
विभागीय कार्यालय,शिवणी,अकोला
Mob. 7588609297 Mail -:rmakola@mahabeej.com
Web: - www.mahabeej.com CIN:- U01200MH1976SGC01

## परिशिष्ट "अ"

**वाहन भाडयाने पुरवठा करण्याबाबतच्या निविदेच्या शर्ती व अटी**

i) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांना त्यांचे विभागीय कार्यालय अकोला येथे कार्यालयीन वापरा करीता मासिक धर्तीवर **स्वीफ्ट डिझायर** किंवा समकक्ष बनावटीच्या परवाना प्राप्त (नॅशनल परमिट) वाहनाचा भाडे तत्वावर पुरवठा करण्याकरीता विविध ठिकाणचे टॅक्सी सेंन्टर कडुन ई—निविदा मागविण्यात येत आहेत.

ii) निविदा अर्ज महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर म्हणजेच www.mahatenders.gov.in हया वेबसाईटवर उपलब्ध आहेत. ई—निविदा अर्ज वरील वेबसाईट वरून मिळविण्या करिता कुठलेही शुल्क दयावे लागत नाही. सदर निविदा फक्त ई—टेंडर द्वारा स्विकारण्यात येणार आहेत व लिखित स्वरुपात स्विकारण्यात येणार नाहीत. जर निविदा अर्ज भरण्यासाठी कोणतीही अडचणी असल्यास विभागीय कार्यालय अकोला येथिल अधिकाऱ्याची मदत घ्यावी.

iii) निविदा अर्जाची रक्कम ही फक्त ऑनलाईन पद्धतीने भरावे लागतील याची निविदा धारकाने नोंद घावी.

iv) निविदा प्रक्रियेतील भाग असलेले सर्व परिशिष्ट 'अ' व 'ब' निवेदेच्या शर्ती व अटी हया निविदेतील डाक्युमेंटस् म्हणून गृहीत धरल्या असून ही बाब निविदा धारकांस मान्य असून ती त्यांना संमत आहे. परिशिष्ट **ब** म्हणजेच तांत्रिक निविदा ही निविदा धारकाने वंरिल वेबसाईट वर अपलोड करावयाची आहे त्या सोबत परिशिष्टब मध्ये नमुद केलेले सर्व १ ते ११ सोबत अपलोड करावे अन्यथा तांत्रिक निविदा नाकारण्याचे अधिकार विभागीय समितीला राहील. दराच्या निविदा (BOQ) हया स्वंतत्र राहतील व ज्या निविदा धारकांच्या तांत्रिक निविदा मंजूर करण्यात येतील त्यांच्याच दराच्या निविदा उघडण्यात येतील. सदर वाहनाच्या पुरवठयाकरिता मासिक किती खर्च होणार यांची अंदाजीत रक्कम दिलेली आहे. त्या अंदाजीत रक्कमेवर कमी किंवा जास्त रक्कम दयाव्याचे आहे.

v) निविदे सोबत अर्जदाराने आपला संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक देणे तसेच त्या सोबत आपल्या प्रतिष्ठानांची टॅक्सीसेंन्टर म्हणुन नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र, शॉप ॲन्ड इस्टॅब्लीशमेंन्ट ॲक्ट खाली नोंदणी झाली असल्याचे प्रमाणपत्र, पॅनकार्डची सत्यप्रत सादर करणे बंधनकारक राहील.

vi) निविदा प्रक्रियेतील भाग असणारे सर्व परिशिष्ट तथा निविदेच्या सर्व शर्ती व अटी हया निविदेतील कागदपत्र (डॉक्युमेंन्टस) म्हणुन गणल्या जातील व ही बाब निविदा धारकांस मान्य असुन त्याची सहमती आहे असे गृहीत धरले जाईल व ही सर्व परिशिष्टे ई—निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

महाबीज

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
## विभागीय कार्यालय,शिवणी,अकोला

Mob. 7588609297 Mail -:rmakola@mahabeej.com
Web: - www.mahabeej.com CIN:- U01200MH1976SGC01



**vii)** निविदा प्रक्रियेत जे निविदाधारक स्वत:च्या किंवा प्रतिष्ठानाच्या (फर्मच्या) नावाने भाग घेतील, त्या बाबत ही बाब अध्यावत आहे की, अशा प्रतिष्ठानचे आर्थिक व्यवहार व संबंधीत पुस्तके /दस्तऐवज ही कायदयान्वये अद्ययावत ठेवलेली आहेत. तसेच परिशिष्ट **ब** मध्ये प्रगट केलेली माहीती सत्य असुन, ही त्यांची वैयक्तीक जबाबदारी ठरेल. महामंडळावर या बाबत कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही. यदाकदाचीत संबंधीत सक्षम अधिकारी तथा कार्यालयाव्दारे काही मागण्या झाल्यास, महामंडळाशी त्या विषयी निविदाधारकाने प्रपत्रात ज्या बाबी स्वाक्षरीने प्रगट केल्या आहेत त्यांचा तपशिल देण्यास महामंडळास मुभा राहील. **तसेच प्रगट केलेली माहीती खोटी व असत्य तथा कार्यालयाची फसवणुक तथा दिशाभुल करणारी आहे असे सिध्द झाल्यास निविदा धारकाने सादर केलेली निविदा खारीज करून त्या प्रतिष्ठानाचे नांव काळया यादीमध्ये टाकण्याचे अधिकार महामंडळास राहील.**

**viii)** निविदा प्रक्रियेत भाग घेऊ इच्छीणा—या भागधारकाला निविदा प्रपत्रासोबत रू. ५०००/— (रू.पाच हजार केवळ) अनामत रक्कम व निविदा प्रपत्र ची फी रू ५९०/(जी.एस.टी सह) —म्हणुन आनलाईन भरावे लागतीलव अनामत राशीवर कुठल्याही प्रकारचे व्याज महामंडळ देणार नाही. अनामत राशी जमा न करता सादर केलेल्या निविदा खारीज (रदद) समजण्यात येतील. निविदा सादर करतेवेळी भरणा करण्यात आलेली रक्कम रू.५०००/— (रू.पाच हजार केवळ) ही निविदाधारकाला निविदा स्विकृत वा अस्विकृती संबधीचा अंतीम निर्णय झाल्यानंतरच RTGS व्दारे परत करण्यात येईल.

**ix)** ज्या निविदाधारकांची निविदा स्विकृत केली जाईल त्या निविदा धारकांस स्विकृती आदेश निर्गमीत झाल्यापासुन तात्काळ सात दिवसाचे आत रू. १००००/— (रू.दहा हजार केवळ ) या प्रमाणे सुरक्षा रक्कम म्हणुन धनादेश (डिडि) RTGS व्दारे या कार्यालयास या कार्यालयाच्या नावे भरणा करावी लागेल व सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. स्विकृती आदेशन्वये देण्यात आलेल्या कालावधीमध्ये सुरक्षा रक्कमेचा भरणा करण्यास कोणत्याही प्रकारचा कसुर केल्यास निविदा खारीज (रदद) करण्यात येवुन भरणा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्या बाबतची कोणत्याही प्रकारची तक्रार वा स्पष्टीकरण दिले जाणार नाही.

**x)** १) कामाचे स्वरूप व आवश्यकतेनुसार BOQ मधील नमुद बनावटीपैकी कोणत्याही प्रकरच्या डिझेल/पेट्रोल वाहनाचा पुरवठा स्विकृती आदेशान्वये भाडे तत्वावर मासिक धर्तीवर करावा लागेल. त्यामुळे BOQ मध्ये देण्यात आलेल्या तपशिलानुसार त्यांचे दर व्यवस्थितरित्या देण्यात यावेत.

२) पुरवठा करण्यात येणारे वाहन मार्च २०२२ नंतरची उत्पादित तसेच टॅक्सी परवाना असलेली (नॅशनल परमीट) असावी. वाहनाचा पुरवठा प्रत्येक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या आवश्यकतेनुसार. केंव्हाही व कोठेही महामंडळाच्या महाराष्ट्र राज्य व राज्याबाहेरील कार्यक्षेत्रामध्ये करावा लागेल. त्यामुळे दर भरतांना त्या संबंधीच्या सर्व बाबी विचारात घ्याव्यात.

Scanned with OKEN Scanner

महाबीज

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
## विभागीय कार्यालय,शिवणी,अकोला

Mob. 7588609297 Mail -:rmakola@mahabeej.com
Web: - www.mahabeej.com CIN:- U01200MH1976SGC01



३) वाहन भाडयाने पुरवठा करण्याकरीता मासिक धर्तीवर मागविण्यात आलेल्या दर प्रपत्रातील दराची तुलना करून, आवश्यकता वाटल्यास तडजोडीने कमीत कमी दर निश्चीत करण्यात येतील.

४) स्विकृती आदेशान्वये मंजुर करण्यात आलेल्या धोरणावर देण्यात आलेल्या मर्यादेनुसार प्रत्यक्ष करण्यात आलेल्या वापराचे भाडे अदा करण्यात येईल. तसेच वाहन ज्या कार्यालयाचे वापरा करीता आवंटीत केले जाईल तेच ठिकाण या बाबतचे पुढील आदेशा निर्गमीत होईपर्यत वाहनाचे व वाहन चालकाचे मुख्यालय राहील.

५) वाहनाचे कोणत्याही कारणास्तव कुठल्याही प्रकारचे नुकसान वा दुर्घटना किंवा काही जिवीत हानी झाल्यास, कायदयान्वये अशी पुर्तता वा भरपाई देण्याची जबाबदारी पुर्णत: संबंधीत वाहन मालकाची राहील व त्या करीता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

६) भाडयाने पुरवठा करण्यात येणारे वाहन २४ तास कार्यालयीन कामाकरीता उपलब्ध करून देणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

७) वाहन चालकाने वेतन व भत्ता तसेच कायदयान्वये देय असलेली इतर राशी त्यास वेळेत अदा करण्याची जबाबदारी पुर्णत: वाहन मालकाची राहील.

८) पुरवठा करण्यात येणारे वाहन सदैव सुस्थितीमध्ये ठेवण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील तसेच इंधन, टोल, व दुरूस्ती पोटी येणारा खर्च अदा करण्याची जबाबदारी ही वाहन मालकाची राहील.

९) पुरवठा करण्यात येणारे वाहन हे केवळ वाहन चालकाच्या किंवा वाहन मालकाच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहील्यास स्विकृती आदेशान्वये मंजुर करण्यात आलेल्या प्रति दिन दरानुसार तेवढया दिवसांचे भाडे (रक्कम) वाहन मालकाच्या देयकातुन कपात करण्यात येईल.

१०) पुरवठा करण्यात येणारे वाहन संबंधीत अधिका—याच्या अधिनस्त राहील. परंतु संबंधीत अधिकारी किंवा तेथे कार्यरत असलेल्या इतर कोणत्याही कर्मचा—याला वाहन चालवु देवु नये व जर त्यामुळे कोणत्याही प्रकारची अनुचित घटना/प्रकार घडल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.तसेच पुरवठा करण्यात येणारे वाहन हे **कार्यालयीन वेळेनंतर तसेच सुटीच्या दिवशी महामंडळाच्या आवारात लावणे बंधनकारक राहील**

११) पुरवठा करण्यात येणा—या वाहनाचा गैरवापर होणार नाही याची दक्षता वाहन मालकांस घ्यावी लागेल करीता कार्यालयामार्फत पुरवठा करण्यात येणारे लॉग बुक भरण्याच्या दृष्टीने संबंधीत वाहन चालकाची शैक्षणिक पात्रता कमीत कमी एस.एस.सी. असणे आवशयक असून, तो शारिरीक दृष्टया सुदृढ व र्निव्यसनी असावा.

१२) वाहन दुरूस्ती करीता लागणारे दिवस किंवा होणारा वापर (किलोमिटरमध्ये) हा कार्यालयीन कामकाजाचा भाग म्हणुन ग्राहय धरण्यात येणार नाही. त्यामुळे त्या कालावधीचे वा तेवढया किलोमिटर वापराचे शोधन केले जाणार नाही.

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
## विभागीय कार्यालय,शिवणी,अकोला

Mob. 7588609297 Mail -:rmakola@mahabeej.com
Web: - www.mahabeej.com CIN:- U01200MH1976SGC01




१३) वाहन किंवा वाहन चालकाच्या कामाबद्यल कोणत्याही प्रकारची तक्रार संबंधीत अधिका—याकडुन प्राप्त झाल्यास वाहन तात्काळ बंद करण्यात येवुन, २४ तासाचे आत भाडोत्री वाहनाचे पुरवठा संबंधी करण्यात आलेला करार खारीज (रदद) करण्यात येईल व दंडात्मक कारवाई म्हणुन त्या प्रतिष्ठानाचे नांव काळया यादीत टाकण्यात येईल.

१४) वाहन नादुरूस्त झाल्यास किंवा वाहन चालकाच्या रजेच्या कालावधीमध्ये वाहन मालक वाहनाची किंवा वाहन चालकाची पर्यायी व्यवस्था करून देईल. तसेच स्विकृती आदेशात देण्यात आलेल्या कालावधीमध्ये पर्यायी व्यवस्था न केल्यास तेवढया दिवसाचे भाडे अदा केले जाणारनाही व गैरसोयी करीता प्रति दिन रू. १०००/— या दराने दंड आकारण्यात येवुन त्याची वसुली सुरक्षा ठेव तसेच देयकातुन करण्यात येईल.

१५) पुरवठा करण्यात आलेल्या वाहनाचे, प्रत्यक्षात करण्यात आलेल्या वापराचे भाडे वाहन मालकास महिन्याच्या अंतीम तारखेनंतर RTGS/NEFT व्दारे अदा करण्यात येईल. त्याकरीता वाहन मालकास देयक हे विहीत नमुन्यात सादर करणे बंधनकारक राहील.

१६) परिवहन विभाग, पोलीस विभाग, किंवा विमा कंपनीच्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे वाहन, वाहन चालकास किंवा वाहन मालका विरूध्द कोणत्याही प्रकारची कायदेशीर कार्यवाही संबंधीत विभागाचे सक्षम अधिकारी किंवा कार्यालया मार्फत करण्यात आल्यास, त्यास वाहन मालक सर्वस्वी जबाबदार राहील व कार्यवाहीचा कालावधी हा कार्यालयीन कामकाजाचा भाग म्हणुन ग्राहय न धरता त या कालावधीचे शोधन केले जाणार नाही. तसेच कायदयान्वये देय असलेले सर्व प्रकारचे कर अदा करण्याची जबाबदारी देखील पुर्णत: वाहन मालकाची राहील.

१७) पुरवठा करण्यात येणा—या वाहनाचा वापर कार्यालयीन कामाकाजाचे वेळेपेक्षा अधिक कालावधीसाठी करण्यात आल्यास त्यापोटी अतिरीक्त भाडे, भत्ता, हॉलटींग चार्ज इत्यादी देय राहणार नाहीत.

१८) स्विकृती आदेशान्वये पुरवठा करण्यात येणा—या वाहनासंबंधी खालील दस्ताऐवजाच्या सत्यता दर्शक छायाप्रती या कार्यालयास सादर कराव्या लागतील. **(वाहन नोंदणी प्रमाणपत्र, वाहनकर प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, प्रदुर्षण विरहीत प्रमाणपत्र, टॅक्सी परवाना तथा नॅशनल परमिट, वाहन चालकाचा परवाना.)**

१९) कोणत्याही प्रकारच्या अपघातामुळे काही जिवित हानी झाल्यास अशी नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीने, वाहनाव्दारे प्रवास करणारे अधिकारी व कर्मचारी तसेच वाहन चालकाचा विमा उतरविणे आवश्यक राहील त्या करीता वाहनाचा कॉम्प्रेंसीव्ह इन्शुरन्स असणे वाहन मालकावर बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

महाबीज

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
## विभागीय कार्यालय,शिवणी,अकोला

Mob. 7588609297 Mail -:rmakola@mahabeej.com
Web: - www.mahabeej.com CIN:- U01200MH1976SGC01



२०) कराराच्या कालावधीत इंधनाच्या दरामध्ये १० टक्के पेक्षा जास्त वाढझाल्यास पुरवठा करण्यात आलेल्या वाहनाची सरासरी (ॲव्हरेज) १२ कि.मि. प्रति लिटर ग्राहय धरून त्या प्रमाणात इंधन खर्चात तशा बदलानुरूपची वाढ देण्यात येईल व त्यानुसार शोधन करण्यात येईल. तसेच इंधनाचे दर कमी झाल्यास हाच नियम लागु राहील.

२१) स्विकृती आदेश पारीत झाल्यानंतर संबंधीत वाहन मालकास भाडयाने/पुरवठा करण्यात येणारे वाहन निश्चीत ठिकाणी पाठविण्यापुर्वी या कार्यालयाकडे तपासणी करीता मुद्या क्रमांक १८ मध्ये नमुद केलेल्या दस्तऐवजाच्या मुळप्रतिसह उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. संबंधीत वाहन सुस्थितीमध्ये आहे किंवा नाही याची खात्री केल्याशिवाय ते वापरात घेतले जाणार नाही.

२२) कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क मा. व्यवस्थापकीय संचालक म.रा.बि.म. मर्यादित, अकोला यांनी राखुन ठेवला आहे.

२३) वाहन भाडयाने घेण्यासंबंधीचा कालावधी स्विकृत आदेश पारीत झालेल्या तारखेपासुन पुढील सहा महिन्याच्या कालावधी करीता राहील. तसेच कार्यरत असलेल्या प्रतिष्ठानाची सेवा समाधानकारक आढळुन आल्यास वाहन पुरवठया संबंधी करण्यात आलेल्या करारातील सर्व शर्तीस व अटीस अधीन राहुन संबंधीत प्रतिष्ठानांस पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

२४) या निविदेतील शर्ती व अटी या बाबत काही वाद उपस्थित झाल्यास मा. व्यवस्थापकीय संचालक म.रा.बि.म. मर्यादित, अकोला यांचा निर्णय अंतीम राहील व सरतेशेवटी कोणताही वाद फक्त अकोला न्यायालयीन कार्यक्षेत्रात चालतील.

स्वाक्षरी /—
विभागीय व्यवस्थापक
म.रा.बि.म.मर्यादित,

निविदाधारकाची सही :— ......................................

नांव— ..................................................

दिनांक— ........................................

Scanned with OKEN Scanner

महाबीज

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
# विभागीय कार्यालय,शिवणी,अकोला

Mob. 7588609297 Mail -:rmakola@mahabeej.com
Web: - www.mahabeej.com CIN:- U01200MH1976SGC01

## परिशिष्ट "ब"

## निविदाधारकाने आपल्या प्रतिष्ठाणा बद्यल सादर करावयाचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| १ | प्रतिष्ठाणाचे नांव व पत्ता | ______<br>______<br>______ |
| २ | दुरध्वनी क्रमांक | प्रतिष्ठाण<br>निवास<br>मोबाईल |
| ३ | शॉप ॲन्ड इस्टॅब्लीशमेंन्ट ॲक्टनुसार नोंदणी क्रमांक व मुदत | |
| ४ | प्रतिष्ठाणाची टॅक्सी सेंन्टर म्हणुन नोंदणी प्रमाणपत्र क्र. व मुदत | |
| ५ | प्रतिष्ठानाचे नोंदणीकृत मालकाचे संपुर्ण नाव | |
| ६ | स्थायी लेखा संख्या (पॅन कार्ड नं.) | |
| ७ | स्वमालकीचे परवाना असलेल्या वाहनाच प्रकार व नोंदणी क्रमांक (सोबत सर्व वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राच्या सत्यतादर्शक छायांकीत प्रति जोडणे बंधनकारक आहे. | अ.क्र. राष्ट्रीय परवाना संख्या नोंदणी क्रमांक |
| ८ | आपण सदरहु धर्तीवर ज्या ज्या ठिकाणी वाहनाचा पुरवठा करीत आहात त्या संस्थेची नांवे | १<br>२<br>३ |
| ९ | आपण यापुर्वी महामंडळामध्ये वाहन पुरवठा केलेला आहे काय ? | होय/नाही |
| १० | महामंडळाच्या शर्ती व अटीचे पालन तथा त्यानुसार वाहनाचा वेळेत पुरवठा करण्यास आपले प्रतिष्ठाण असमर्थ ठरले काय? | होय/नाही |
| ११ | असमर्थ तथा शर्ती व अटीचे उल्लंघन केल्यामुळे आपल्या प्रतिष्ठाणा विरूध्द लेखी वा आर्थीक स्वरूपात दंडात्मक कार्यवाही करण्यात आली काय? | होय/नाही |

स्थळ :
दिनांक :

स्वाक्षरी
नांव
शिक्का
दिनांक:—

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
## विभागीय कार्यालय,शिवणी,अकोला
Mob. 7588609297 Mail -:rmakola@mahabeej.com
Web: - www.mahabeej.com CIN:- U01200MH1976SGC01


प्रति,
मा. विभागीय व्यवस्थापक,
म.रा.बि.म. मर्यादित,
अकोला

विषयः— महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने अंतर्गत यांना त्यांचे विभागीय कार्यालय अकोला करीता भाडे तत्वावर टॅक्सी तथा नॅशनल परमिट वाहनाचा पुरवठा करणेबाबत.

संदर्भः— निविदा क्रमांक :— विव्य/महाबीज/अकोला/२०२५-२६/६२६ दि. ०३/०१/२०२६

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन, मी.......................................आपले निदर्शनास आणुन देवु ईच्छितो की, सदर्हु पुरवठयाच्या हेतुने परिशिष्ट अ व ब मध्ये देण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचलेल्या असुन, त्या मला समजलेल्या आहेत, सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन, माझेवर बंधनकारक राहतील. निविदाधारक या नात्याने मी माझे दर विहीत सहपत्रामध्ये देत आहे. निविदेच्या अटीनुसार मी खालील प्रमाणे अनामत रक्कम भरणा म्हणुन रू. ५०००/— (रू पाच हजार फक्त ) व निविदा प्रपत्र ची फी रू.५९०/(जी.एस.टी सह)—ऑनलाईन भरलेली आहे.

आपला विश्वासु

सही.............................................

पुर्ण नाव ..........................................

शिक्का

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
विभागीय कार्यालय,शिवणी,अकोला
Mob. 7588609297 Mail -:rmakola@mahabeej.com
Web: - www.mahabeej.com CIN:- U01200MH1976SGC01

## Documents requirement as per E-Tender

1) Copy of PAN card and Aadhar Card (Owner of Taxi Center).
2) Copy of Certificate of Registration of the provider.
3) Copy of Certificate of Insurance of Vehical (Comprehensive).
4) Copy of Certificate of Tourist/National permit.
5) Copy of the Certificate of Fitness of Vehicle.
6) Copy of the Certificate of Pollution of Vehicle.
7) Copy of Valid Driving licence of driver engaged.
8) Experience Certificate.

Scanned with OKEN Scanner